RNI No: MAHMAR/2004/13776 ✸ Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On: 12 Jan 2015 ✸ Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 15 Jan 2015

अजायब ✲ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : बारा | अंक : सातवा | जानेवारी २०१५



भजन गाण्याचे महत्व 4

शहराकडे जाणारा रस्ता 7

प्रश्नोत्तरे 27

प्रेरणा 33

धन्य अजायब 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

भजन गाण्याचे महत्व

परम संत अजायब सिंहजी महाराजांनी भजने गाण्याच्या कार्यक्रमाप्रारंभी दिलेला एक महत्मपूर्ण संदेश

सब पर दया करो (३) गुरु पाल
सब के कष्ट हरो (३) गुरु पाल
सब पर दया करो .....

१. हम बालक तुम पिता हमारे, तुम बिन बिगड़ी कौन सवारे, (२)
तम्स हरो गुरु ज्योति जगाओ, भटक रहे है राह दिखाओ, (२)
भुला दिया अगर तुमने ही हमको, कौन करेगा ध्यान,
सब पर दया करो .....

२. मानव बनकर हम जी पाऐं, इस धरती पर स्वर्ग सजाऐं (२)
कटे पाप की काली कारा, बहे नाम की अमृत धारा, (२)
सब संगत का मान बढ़े नित, सबका हो कल्याण,
सब पर दया करो ....

३. जिसके मन में मूरत तेरी जिसके मूँह पर तेरा नाम (२)
पलक झपकते बन जाते है, उसके बिगड़े सारे काम, (२)
दया मेहर हो जाए तेरी, मेरा बन जाऐ काम,
सब पर दया करो ...

४. कृपाल गुरु बस इतना वर दो, तन मन धन सब निर्मल कर दो. (२)
हर दुविधा से हो छुटकारा, सबमें दीखे रूप तुम्हारा, (२)
सच्चे मन से करे तुम्हारा, अजायब गुणगान,
सब पर दया करो....

परमपिता परमात्मा सावन–कृपालजींच्या चरणी नमस्कार असो, ज्यांनी आपणांस त्यांचे गुणगान आणि भक्ती करण्याची संधी दिली. गुरु अर्जुनदेवजी महाराजांनी प्रेमाने म्हटले आहे की,''ती जीभच कापून टाकावी जी गुरुंचे गुणगान करत नाही, ते कान बंद करावेत जे गुरुंनी दिलेली शब्दधुन ऐकत नाहीत, ते डोळे काढून टाकावेत जे सतगुरुंचे स्वरूप पाहत नाहीत, जे गुरुंचे दर्शन करून खूष होत नाहीत.''

जेव्हा करण–कारण परमात्मा आपल्यावर दया करतो तेव्हाच आपण त्याच्या प्रेमाचे आणि तळमळीचे गीत गाऊ शकतो. मी भजन गाण्याच्या महत्त्वाबद्दल खूप काही सांगितले आहे, जे आपण सर्वांनी मासिकातदेखील वाचले आहे की भजन गाणे किती जरूरी आहे. भजन गाणे हे ध्यान–अभ्यासापेक्षा कमी श्रेष्ठ नसते.

महाराज कृपाल सांगत असत की,''ध्यान अभ्यासास बसण्यापूर्वी असे भजन गा, जे आपल्या अंतरात्म्यात तळमळ निर्माण करते.'' भजन गाणे हे गुरुंपुढे आपली नम्रता व्यक्त करण्याची खूप चांगली संधी असते. भजनाद्वारे आपण गुरुंपुढे आपला एक–एक दोष मोजून सांगतो. परंतु आपले भ्रमिष्ट मन कधीही मानत नाही की मी हे गुन्हे केलेले आहेत. आपण नामस्मरणाद्वारे जेव्हा आपले ध्यान नऊ द्वारांतून काढून नेत्रांच्या पाठी पूर्णपणे एकाग्र होऊन



आत्म्यावरील तीनही पडदे दूर सारतो, तेव्हा आपण त्या जागी पोहचतो जेथून गुरु–शक्ती आलेली असते. खरी नम्रता, खरी दीनता आणि गुरुंसाठी खरे प्रेम त्या जागी जाऊनच निर्माण होते. त्या स्थाना खाली यासंसारात आपण संतांनी लिहिलेली प्रार्थना गातो. संत–महात्मा आपण जीवांच्या दुर्बलतेला खूप बारकाईने जाणतात. भजनांच्या रूपात त्यांच्या पवित्र आत्म्यातून जी कल्पना उत्पन्न होत असते तीच त्यांची खरी तळमळ व खरी विनंती असते. जर आपण आपले जीवन त्या भजनांना अनुसरून ढाळले तर आपणही त्या प्रार्थनांचा फायदा उठवू शकू.

सर्वसामान्य लोक जी कविता लिहितात ती मन बुद्धिची कल्पना असते. आपण जितकी कल्पना करतो तितके आपण पवित्र नसतो कारण ही कल्पना काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकारानी भरलेल्या हृदयातून येते. परमगतीला प्राप्त झालेल्या संतांनी अंतर्यात गुरुशक्तीला बघून, त्या शक्तीशी एकरूप होऊनच ती प्रार्थना लिहिलेली असते. आपण देखील त्या प्रार्थनेचा फायदा घेतला पाहिजे. जर आपण त्या शुष्क लोकांची कविता वाचली तर आपणही शुष्क होऊ आणि आपल्यावरही तसाच परिणाम होईल.

आपणांस माहित आहे की, जेव्हा प्रेमी येतात तेव्हा सर्व एकत्र मिळून भजन गातात. आज आपला भजन गाण्याचा कार्यक्रम आहे, ज्यांना भजन गाण्याची परवानगी मिळेल त्यांनी भजनमालेतील पृष्ठ क्रमांक जरूर सांगावा ज्यामुळे इतर प्रेमींना पुस्तकातून भजन शोधणे सोपे होईल. ***

शहराकडे जाणारा रास्ता

सत्संग : परम संत अजायब सिंहजी महाराज, सूफी संत फरीद साहेबांची वाणी, मुंबई, महाराष्ट्र – १० जानेवारी १९८७

मी नेहमी सांगत असतो की ही फुलबाग राजाधिराज सर्वेश्वर बाबा सावन सिंहजींची आहे. आपण अत्यंत प्रेमाने आम्हांस घरगुती उदाहरणे देऊन समजावत असत. या संसारात आलेले सर्वच संत–महात्मा आपणांस अशा घरगुती गोष्टींचे उदाहरण देऊन समजावतात, ज्यांत आपण अडकलेलो असतो.

बाबा सावन सिंहजी एका राजपुत्राचे उदाहरण देत असत की तो वाईट लोकांच्या संगतीत जाऊन शिक्षणाची टाळाटाळ करू लागला, तो अभ्यास करेनासा झाला. राजा–राणीस खूप काळजी वाटू लागली की आपण इतक्या मोठ्या राजघराण्यातील आहोत व जर या राजपुत्राने शिक्षण घेतले नाही तर मग हा राज्याचा कारभार चालवू शकणार नाही, राज्य बरबाद करेल. म्हणून त्यांनी चांगल्यातला चांगला शिक्षक ठेवून पाहिला, परंतु कोणत्याही शिक्षकास त्यास विद्या देण्यात यश मिळाले नाही.

शेवटी राजा–राणीस नाकीनऊ आला असता, कोणीतरी त्यांस सल्ला दिला की आपण संसारी लोक जो गुंता सोडवू शकत नाही, संतमहात्मा त्या गुढप्रश्नावर तोडगा काढतात कारण महात्मा अनुभवी असतात, ते अत्यंत प्रेमाने जीवनविषयक गुढप्रश्न सोडवतात. राजाने महात्मांकडे जाऊन प्रश्न केला की,''माझा मुलगा शिक्षणाची टाळाटाळ करतो, माझ्या पश्चात ह्याच्या शीरावर राजकारभाराची जबाबदारी पडेल, तेव्हा हा राजकारभार कसा काय चालवू शकेल?''महात्मा राजास म्हणाले,''काही हरकत नाही. तू या राजपुत्रास माझ्याकडे सोडून दे, मी यास शिक्षण देईन.'' राजा महात्मांचे सांगणे ऐकून चकित झाला की, महात्मा यास कसेकाय शिक्षण देऊ शकतील! महात्मांनी सर्वप्रथम राजपुत्राच्या सवयींचे निरीक्षण केले.

महात्मांनी राजपुत्रास म्हटले,''तुला ज्या गोष्टींची आवड आहे, आपण त्याच गोष्टी करु.'' राजपुत्र म्हणाला, ''मला कबुतरे उडविण्याचा छंद आहे.'' महात्मा म्हणाले,''मला देखील बालपणी कबुतरे उडविण्याचा छंद होता.''

महात्मांनी सुरुवातीस एक-दोन कबुतरे आणली तेव्हा राजपुत्र म्हणाला ही फार थोडी आहेत, म्हणून महात्मांनी बरिचशी कबुतरे आणली व राजपुत्रास म्हणाले,''आपण या निरनिराळ्या कबुतरांची नावं ठेवली नाहीत तर आपणांस कसे कळेल की कोणते कबुतर आजारी आहे व कोणते कबुतर सशक्त आहे, कोणत्या कबुतराने आभाळात भरारी मारलेली आहे व कोणत्या कबुतरास भरारी मारण्यासाठी तयार करायचे आहे. म्हणून आपण या कबुतरांची नावं ठेवूया.'' राजपुत्र महात्मांशी सहमत झाला कारण त्याचा छंद पूर्ण होत होता.

महात्मांनी एका कबुतराचे नाव 'क' ठेवले तर दुसऱ्या कबुतराचे नाव 'ख' ठेवले. सर्व कबुतरांची नावं बाराखडी प्रमाणे ठेवल्या नंतर महात्मा म्हणाले अजुनही जास्त कबुतरे आहेत, तेव्हा आपण उरलेल्या कबुतरांची नावं अक्षरे जोडून ठेवूया. राजपुत्र जोडाक्षरांनी ठेवलेल्या कबुतरांच्या नावांनी त्यांस बोलावू लागला व सोबत ती जोडाक्षरे देखील पाठ करु लागला.

मग महात्मांनी राजपुत्रास वाचण्यास प्रथम बाराखडी दिली व त्यानंतर लहानसे पुस्तक दिले ज्यात लहान मुलांसाठी छान गोष्टी होत्या. अशारितीने मुलास शिक्षणाची आवड निर्माण झाली. तो समंजस झाला व शेवटी त्याने स्वत:च कबुतरांचा छंद सोडला.

महाराज सावन सिंहजी सांगत असत की,''संतांकडे जीवांसाठी अनेक प्रकारचे तोडगे असतात. ते निरनिराळ्या तऱ्हेने समजून घेतात की जीवाची रुची कोणत्या गोष्टीत आहे? यास कोणत्या रोगाने आजारी केलेले आहे? यास कोणते औषध दिले पाहिजे.'' त्याचप्रमाणे सूफी संत फरीद साहेब देखील आपल्या वाणीतून संसारात सामान्य जीवनात आढळणारी उदाहरणे देऊन जीवांना समजावले व परमार्थमार्गी लावले.

एक माणूस त्याच्याकडील हिरा विकण्यासाठी फार घाईत बाजारात चालला होता. त्याने आपल्या वस्त्राच्या पदरास हिरा बांधताना घाईत सैल गाठ बांधली. वाटेत ती गाठ सुटली व हिरा खाली पडला. जेव्हा तो बाजारात हिरा विकण्यासाठी पोहचला तेव्हा त्याच्या लक्षात आले की त्याचा मौल्यावान हिरा हरवलेला आहे, तेव्हा त्यास धक्का बसला. आपल्या जीवनात देखील अनेक अशा घटना घडतात. जर आपली एखादी मौल्यवान वस्तू किंवा धन–संपत्ती गमावते किंवा सोन्याचा ऐवज हरवतो तेव्हा आपण एकदम हृदय पकडून खाली बसतो की हे काय झालं? आता ती वस्तू कुठून आणणार?

तो माणूस धावत फरीद साहेबांकडे आला व म्हणाला,''तुम्हा संत–महात्म्यांकडे अंतर्यामतेची शक्ती असते, माझा हिरा हरवलेला आहे, आपण माझ्यावर दया करा व तो कुठे आहे ते सांगा.'' फरीद साहेब म्हणाले,''सज्जन मनुष्या, तुझ्या निष्काळजीपणामुळे हिरा हरवलेला आहे. जर तू त्या हिऱ्यास मौल्यवान समजले असतेस तर तू नीट घट्ट गाठ बांधली असतीस व तुला आज मानसिक तणाव झाला नसता.''

हे तर केवळ एक सांसारीक उदाहरण आहे. आपला मनुष्यजन्म अत्यंत मौल्यवान आहे. जर आपणांस या गोष्टीचे ज्ञान झाले की हा मौल्यवान हिऱ्या समान मनुष्यजन्म आपणांस विकत देखील घेता येत नाही, तो व्यर्थ निघून चाललेला आहे. जर आपण समंजस असलो तर त्या प्रभू परमात्मारुपी गुरूंशी पक्के प्रेम केले पाहिजे की ज्यामुळे आपले हे जीवन सफल व्हावे.

जे जाणा लड़ छिजणा पीडी पाईं गंढ।।
तैं जेवड मैं नाहिं को सभ जग दिट्ठा हंढ।।

फरीद साहेब सांगतात, जर आपण जीव समंजस असलो तर आपण गुरु परमात्म्याशी प्रेमाच्या शृंखलेत कसून गाठ बांधुन घेऊ की कदाचित ती गाठ सुटु नये. कधी मन या शृंखलेस तोडेल याची खात्री नाही.

मग आपण म्हणता, ''हे सतगुरु! मी सर्व संसार फिरून तुझ्या द्वारी आलो आहे, मला संसारात तुमच्यासारखा कोणीही भेटला नाही.''

फरीदा जे तू अकल लतीफ, काले लिख न लेख।।
आपनड़ै घर जाईए पैर तिनां दे चुंम।।

आपणांस जीवनात अनेक ठिकाणी जाणे भाग पडते. एकदा फरीद साहेब सरकारी कचेरीत गेले. आपणांस माहित आहे की तेथे प्रत्येक मनुष्य लाच खाण्यासाठी कसा तोंड उघडून बसलेला असतो, कोणासही याची जाणिव नसते की आपणांस काम करण्यासाठी पगार मिळतो. तेथे एक कारकून पैसे खाऊन आपल्या पक्षात निर्णय देत असे. फरीद साहेबांचा कचेरीतील हा पहिलाच अनुभव होता. फरीद साहेबांनी त्यास म्हटले,''प्रिय मित्रा, तू इतका चतुर, शहाणा, शिकला-वाचलेला आहेस, परंतु लाच खाऊन आपल्या आत्म्यास का कलंकीत करतोस? तू अशी कर्मं का करीत आहेस ज्याची परतफेड तुलाच करावी लागणार आहे. तू आपल्या हृदयात डोकावून पहा की ह्या कर्मांची शिक्षा कोण भोगेल? या कर्मांची परतफेड कोण करेल?''

फरीदा जो तैं मारन मुक्कीआं तिनां न मारें घुंम।।
आपनड़ै घर जाईए पैर तिनां दे चुंम।।

फरीद साहेबांनी आपल्या जीवानाचा अधिकांश भाग ध्यान-अभ्यासात व्यतीत केला. आपण ध्यानात समरस झालेला होतात तेव्हा तेथुन एक अहंकारी मनुष्य जात होता. तो रस्ता चुकलेला होता. त्याने हातवारे करीत फरीद साहेबांना विचारले,''कोणता **रस्ता शहराकडे** जातो?''आपणांस माहित आहे की अभ्यासू व्यक्ती सदैव मृत्युची आठवण ठेवतो. फरीद साहेबांनी कबरींकडे बोट दाखवित म्हटले,''**शहराकडे हाच रस्ता** जातो.''तो मनुष्य त्या दिशेने खूप दूरवर गेला, तथे कबरीच कबरी होत्या. त्याला वाटले की महात्मांनी माझी थट्टा केली, म्हणून त्यांना या थट्टेची सजा द्यावी.

त्या अहंकारी मनुष्याने येऊन फरीद साहेबांना अनेक थप्पड मारल्या, परंतु फरीद साहेब परमेश्वराच्या प्रसन्नतेत हसत राहिले. शेवटी त्या मनुष्याने फरीद साहेबांना विचारले की,''महात्माजी, मी तुम्हाला इतके थप्पड मारले तरी तुम्हास त्याचे काही वाईट वाटले नाही!'' फरीद साहेब म्हणाले, ''बांधवा, मी तुला जे काही सांगितले ते खरे आहे, कारण कबरच खरे शहर आहे. प्रत्येक मनुष्य शेवटी इथे येऊनच वास्तव्य करतो. परमेश्वराच्या प्रिय व्यक्तींमध्ये इतकी नम्रता असते की ते दुष्टपणाचे प्रत्युत्तर दुष्टतेने देत नाहीत, उलट सांगतात, प्रिय माणसा, तुझे भले होवो.''

आमचे सतगुरु महाराज सावन सिंहजी सांगत असत,''जर आपण आपल्या स्वार्थासाठी गप्प राहिलो व थप्पड जरी खाल्ल्या की काहीही करून आपला स्वार्थ साधला जावा, तर तशी नम्रता देखील एक फसवणूक व धोका आहे.'' महात्मा प्रेमाने समजावतात की नम्रता खरीखुरी, श्रेष्ठप्रतीची व प्रामाणिक असली पाहिजे. खरी नम्रता परमात्म्यास प्रिय असते. आपण कधीही कोणाचे वाईट चिंतू नका. लालची मनुष्य इतरांस घाबरतो आणि केवळ लालची मनुष्यच भ्याड असतो. गुरु साहेब म्हणतात:

भय काहूं को देत नेह भय मानत आन।

परमात्म्याचे प्रिय महात्मा कोणासही घाबरवत नाहीत व ते स्वत: देखील भय बाळगत नाहीत. त्यांस सदैव आपल्या गुरूंचे भय असते की आपल्या हातून एखादे असे काम होऊ नये ज्यामुळे आपल्या गुरूंचे नाव खराब होईल किंवा आपले गुरू नाराज होतील. एक सामान्यत: म्हटली जाणारी म्हण आहे:

माड़ा कुत्ता खसमे गाल।

फरीदा जां तौ खटण वेल तां तू रत्ता दुनीं स्यों।।
मरग सवाई नींह जां भरया तां लदया।।

फरीद साहेब हितोपदेश करतात की,''प्रिय मित्रा, तारुण्यात परमात्म्यास प्राप्त करण्याची संधी होती, परंतु त्यावेळी तू विषय–विकारांमध्ये व सांसारीक

मान–मोठेपणा साध्य करण्यात मग्न होतास. जेव्हा वृद्ध झालास, मृत्यु नजरेसमोर दिसू लागला, तेव्हा पश्चातापाने परमार्थाच्या मार्गावर लागलास की आता तरी मी ह्या परमात्म्यास प्रसन्न करावे!'' नशहरा गावी जल्लण जट्ट नावाचा अंतर्यात खूप प्रगती केलेला सत्संगी होऊन गेला. तो म्हणत असे:

छोटे होंदया डंगर चारे, वड्डे होयां हल वाया।
बुढ़े होके माला फेरी, ते रब दा ऊलांबा लाया।।

वृद्धावस्थेत आल्यावर आपण असे म्हणतो की हे परमात्मा! तू असे म्हणू नकोस की आम्ही तुझी भक्ती केली नाही. आपण जाणता की वृद्ध व्यक्तीवर संपूर्ण कुटुंबाचे ओझे असते. त्याच्या मनात बसल्या बसल्या अनेक विचारांचे वादळ निर्माण होते, कधी हा विचार तर कधी तो विचार. त्यांचे मन सांसारीक गोष्टींमध्ये अडकलेले असते. स्वामीजी महाराज सांगतात:

मूर्ख ने यह भार उठाया, अब दुखन से बहु घबराया।

स्वामीजा महाराज म्हणतात, कोणी सांगितले होते की तू ते ओझे उचल? आता घाबरत असतो की मुलगा सांगितलेले ऐकत नाही, तर कधी सून ऐकत नाही. मुलाचा मृत्यु झाला तर रात्री झोपही येत नाही, तेव्हा आपले केस ओढत रहातो. आपणच पहा, इथे कोण खुष आहे? पत्नी नाराज होते तेव्हा तिची समजुत काढण्यासाठी बराच वेळ जातो, तर कोणाचा पती रुसलेला असतो. आपणच पहा, इथे कोण खुष आहे? तू आपल्या ध्यान–अभ्यासाचा वेळ वाया घालविलास. मनुष्य जेव्हा वृद्ध होतो व उसेशी मृत्यु उभा असतो, तेव्हा घरातील लोक म्हणतात यास गीतेचा पाठ वाचून दाखवा, सुखमणी साहेब ग्रंथ ऐकवा. आपण हे सर्व उपाय अगोदरच करावयास हवे होते.

देख फरीदा जो थीआ दाढ़ी होई होई भूर।।
अग्गो नेड़ा आया पिच्छा रहया दूर।।

फरीद साहेब प्रेमाने सांगतात की प्रिय मित्रांनो पहा, तुझ्या डोक्यावरील व तोंडावरील केस पांढरे झालेले आहेत. बालपण, तारुण्य निघून गेले, आता

वार्धक्य आलेले आहे. तुझ्या मृत्युची वेळ निकट आलेली आहे व जन्माची वेळ दूर राहून गेली. गुरू नानक देवजी म्हणतात:

यमराजे दे हेरू आए माया संगल बंध लिया।

सुरुवातीला स्त्री–पुरुषांचे कानाकडील केस पांढरे होतात. ते पांढरे केस कानाजवळ येऊन सांगतात की तू तारुण्य व्यर्थ घालवलेस, आता तरी ध्यान–अभ्यास कर, परंतु आपण त्या पांढऱ्या केसांना बनावटी रंग लावून काळे करतो. आपण बनावटी रंगाने केस काळे जरी केले तरी मृत्युदेवता रंग पाहत नाही. दिवसेंदिवस आपले श्वास कमी होत आहेत व आपल्या आशा–तृष्णा वाढत आहेत. जर त्यास नाम मिळालेले असले तर त्यासमयी देखील नामस्मरण करीत आपल्या गुरुंपुढे अनेक तृष्णा मांडतो की ही देखील पूरी करा व ती देखील पूरी करा. महाराज सावन सिंहजी सांगत असत,''जर गुरु शिष्याच्या अशा सांसारीक गरजा व तृष्णा ऐकू लागले, तर शिष्याचे करोडो जन्म जरी झाले तरी गुरू त्यास घेऊन सचखंडात जाऊ शकत नाहीत. आपला आणि संतांचा मार्ग शब्दनाम, परमार्थ आणि अध्यात्माचा आहे. संत कधीही सांसारीक जीवनात दखल देत नाहीत. संत असा सल्ला देतात की परीश्रम करा, दृढनिश्चय करा. दृढनिश्चयी मनुष्य सांसारीक कामातही सफल होतो व परमार्थीक कामात देखील सफल होतो.''

देख फरीदा जे थीआ सक्कर होई विस।।

सांईं बाझों आपणे वेदण कहीए किस।।

आपण सांगता, गुरुंशिवाय, नामाशिवाय जरी मनुष्याने तोंडाने कितीही गोड शब्दात कथन केले तरी तो परमार्थात यशस्वी होऊ शकत नाही. ज्या विषय–भोगांना आपण साखर किंवा मधाप्रमाणे गोड समजत होतो, वार्धक्य आल्यावर विषय–भोगांमध्ये देखील रस रहात नाही. अंतसमयी खूप पीडा होते, आत्मा शरीरातून निघत नाही. आयुष्यभर इंद्रीयांचे भोग गोड समजून भोगले, आता ते विषाप्रमाणे कडू वाटू लागतात.

गुरु प्राप्त झाले नाहीत, नाम मिळाले नाही, आता कोणत्या साईंपुढे आपले दु:ख सांगुन रडावे? कोणास म्हणावे माझा सांभाळ करा?

फरीदा अक्खीं देख पतीणीआं सुण सुण रीणे कंन।।

साख पकंदी आईआ होर करेंदी वंन।।

फरीद साहेब प्रेमाने सांगतात, संसाराचे रुप-रंग पाहून पाहून नेत्रांची दृष्टी अधु झाली, तरी देखील यास संतुष्टी नाही. मधुर-सांद्र राग ऐकून कान बहिरे झाले, तेव्हा कुटुंबिय ऐकता यावे म्हणून मशीन आणतात की जेणेकरुन वृद्ध व्यक्तीशी गप्पागोष्टी करता याव्यात. वृद्ध होतो, कानावर मशिन ऐकण्यासाठी लावतो व इतके होऊनही म्हणतो मला सिनेमा पहायचा आहे, त्यातील गीते ऐकायची आहेत. जेव्हा शेत पीकते तेव्हा शेतकरी शेत कापतो. आपली देखील हीच अवस्था होते. डोळे व कान निकामी होतात, तरीही मनुष्य जीवनाची आशा ठेवतो. त्यासमयी देखील अनेक तक्रारी करतो की ध्यान-अभ्यास करताना घोटे व गुढगे दुखतात, लक्ष लागत नाही. मृत्यु उसेशी उभा राहून हाक मारतो. काळशक्ती आपणांस भ्रमात पाडते व आपले हाडवैरी मन आपणांस अंतर्यात जाऊ देत नाही, बाह्यजगातच ठेवते.

फरीद कालीं जिनीं न राविआ धौलीं रावै कोय।।

कर साईं स्यों पिर हड़ी रंग नवेला होय।।

फरीद साहेब सांगतात, जरी आपण आपले तारुण्य गमावले असले व आपण वृद्ध झाला असलात, तरी सुद्धा जर आपण शब्द-नामाची कमाई केली तर आपल्यावर नामाचा रंग चढेल. कोणत्याही वयात परमात्म्याचे स्मरण केले तरी परमात्मा आपली भक्ती स्विकारतो.

महाराज सावन सिंहजी नेहमी सांगत असत की,''परमात्म्याच्या कृपेने जर आपल्याला तारुण्यातच नाम मिळालेले असेल तर आपण हिंमत जुटवून तारुण्यातच ध्यान-अभ्यास करून मन-इंद्रियांच्या प्रभावाखालून बाहेर आले



पाहिजे व त्या सुसंधीचा लाभ घेतला पाहिजे. जर तारुण्य निघून गेले असले तर वार्धक्य व्यर्थ जाऊ देऊ नये.''

धृव व प्रल्हाद लहान बालक होते, त्यांनी भक्ती केली, तेव्हा परमात्म्याने त्यांस आपल्या चरणी स्थान दिले. गुरु अमर देवजी महाराज वयाच्या बाहत्तराव्या वर्षी गुरु चरणांपाशी आले. आपण तनो–मनो शब्द–नामाची कमाई केली. आपण खूप श्रद्धेने व प्रेमाने लंगरमध्ये सेवा केली, दूरवरून पाणी भरून आणत असत. गुरुंनी आपणांस जी आज्ञा दिली, आपण त्या आज्ञेचे काटेकोरपणे पालन केले. आपल्या गुरुंनी आपणांस गुरुगादीवर बसण्याची जबाबदारी सोपविली. आपण कोणत्याही अवस्थेत परमात्म्याचे स्मरण केल्यास, परमात्मा त्याचा स्विकार करण्यास तयार असतो.

फरीदा काली धौली साहिब सदा है जे को चित करे।।
आपणा लाया पिरम न लगई जे लोचै सभ कोय।।
एह पिरम प्याला खसम का जै भावै तै देय।।

गुरु अमर देवजी महाराज फरीद साहेबांना प्रेमाने सांगतात, प्रिय शिष्या पहा, जर तारुण्यात नाम प्राप्त झाले, तर परमात्म्यास प्राप्त करणे खूप सोपे असते. वृद्ध मनुष्यास जे काम करण्यास उशीर लागतो, तेच काम तरुण लवकर करू शकतो. जर वृद्ध मनुष्य आपली कंबर ताठ करून दोन तास ध्यानास बसू शकत असेल, तर तरुण आठ ते दहा तास आपली कंबर ताठ करून ध्यानास बसू शकतो. तारुण्यात भक्ती करणे इतके कठीण नाही जितके वार्धक्यात भक्ती करणे कठीण आहे.

अमर देवजींना वार्धक्यात गुरुचरणी जाण्याची संधी प्राप्त झाली होती. ही आपल्या हातातील गोष्ट नसते की आपण हवं तेव्हा नाम प्राप्त करू शकू. तो आपला गैरसमज आहे. प्रेमामृत कोणास व कधी द्यावे, कोणाची नाम प्राप्त करण्याची वेळ आलेली आहे, हे परमात्म्याने स्वत:च्या हातात ठेवलेले आहे.

मी नेहमी सांगतो की, कोणत्या आत्म्यास आपल्या चरणाशी जोडावे व कोणत्या आत्म्यास संसारात विफल करावे हा परमात्म्याचा स्वत:चा निर्णय असतो. परमात्म्याने ज्या आत्म्यांस स्वत:च्या चरणी जोडण्यास निवडलेले असते, केवळ त्यांच्याच हृदयात नामदान प्राप्त करण्याची उत्कंठा उत्पन्न होते व केवळ तेच आत्मे नामदान प्राप्त करू शकतात. प्रेमी जवळ रहात असो वा दूर रहात असो, त्याचा गुरूंसाठी काही फरक पडत नाही, मग त्यासाठी गुरू समुद्र पार करून जावोत, पर्वतावरील शिखर चढून जावोत वा त्या आत्म्यास आपल्याकडे बोलावून घेवोत.

आमचे हुजूर महाराज कृपाल सांगत असत की,''जो पर्वताच्या शिखरावर उभा असतो, त्यास माहित असते की आग कोणत्या जागी भडकलेली आहे.'' त्याचप्रमाणे महात्मा वर सचखंडात बसून पहात असतात की कोणत्या आत्म्याच्या अंतरात तळमळ आहे, मी कोणास भेटले पाहिजे? ज्या आत्म्याची योग्य वेळ येते, तेव्हा महात्मा त्याआत्म्यास नामाच्या रंगात रंगवितात.

आमचे हुजूर महाराज कृपाल सांगत असत की,''परमेश्वरास प्राप्त करणे इतके कठीण नाही जितके मनुष्य बनणे कठीण आहे. परमात्मा भल्या मनुष्याच्या शोधात असतो.'' मी लहानपणापासूनच परिपूर्ण संत–महात्म्यांच्या शोधात होतो. मी अनेक महात्म्यांकडे गेलो. या शोधातच मला बाबा बिशनदासजींकडून दोन शब्दांचे नाम प्राप्त झाले. आपण माझ्या जीवनाचा पाया चांगला भक्कम केलात. मी जमीनीखाली गुहेत बसून अनेक वर्षे ध्यान–अभ्यास केला, मी सत्याच्या शोधात होतो, परंतु मी तृप्त झालो नाही. एके दिवशी महाराज सावनजींनी मला सांगितले,''दुसऱ्या स्थाना पलिकडील पारमार्थीक ठेव देणारा स्वत:च तुझ्या घरी येईल.'' मी त्या क्षणाच्या प्रतिक्षेत बसलो होतो. तत्पूर्वी मला महाराज कृपालजींचा कोणी प्रशंसकही भेटला नव्हता व निंदकही भेटला नव्हता. परंतु त्यांस माहित होते की कोण माझ्या आठवणीत बसलेला आहे? जेव्हा योग्य वेळ आली तेव्हा त्यांनी स्वत:च आपला एक सेवक माझ्याकडे

पाठविला जो मला म्हणाला,''महाराज तुझ्या आश्रमात येऊ इच्छितात.'' मला अत्यंत आनंद झाला की त्या महान सावनजींच्या सांगण्याप्रमाणेच झाले. मी अठरा वर्षे जमीनीखाली बसून ध्यान-अभ्यास करीत होतो, ते स्वत:हून येऊन मला भेटले. परमात्मा गुरु सर्वांना पहात असतात. गुरु अमर देवजी महाराज सांगतात, परमात्मा ज्याच्यावर प्रसन्न होतात त्यास प्रेमामृत देतात. ज्यास हे उच्चस्थान द्यावयाचे आहे की तू ज्या व्यक्तीस नाम देशील त्यास मी आपल्या चरणी स्थान देईन, हे परमेश्वराने स्वत:च्या हातात ठेवलेले आहे.

फरीदा जिन लोयण जग मोहया से लोयण मैं डिठ।।
कजल रेख न सहंदियां से पंखी सूय बहिठ।।

एकदा फरीद साहेब कब्रस्थानातून जात होते, तेथे कोणा व्यक्तीचा शव बाहेर काढलेला होता. कित्येकदा असे होते की कुत्रे शव बाहेर काढतात. त्या शवाचे मांस किड्यांनी खाऊन संपविलेले होते, डोळ्यांच्या खळग्यात जळमटे मांडलेली होती. त्या जळमटांमध्ये छोट्या-छोट्या किड्यांनी अंडी घालून पिल्ले झालेली होती. ते पाहून फरीद साहेब खेद व्यक्त करीत म्हणतात की, ज्या डोळ्यांनी आपण सर्व दुनियेस मोहित करीत होतो, पत्नी पतीस व पती पत्नीस मोहित करीत होता, त्याची दशा पहा. या डोळ्यांतच सर्व काही आहे.

ओ अक्ल के अंधे देख जरा, तैनू सतगुरु दित्तियां अक्खियां ने।
हर कदम ते ठोकर खाना ऐं, ऐहे अक्खियां कास नूं रखियां ने।
कई मारे मर गए अक्खियां विच, कई तारे तर गए अक्खियां दे।
ऐ ज़हर ते अमृत अक्खियां विच, ऐ रमजां किसने लिखियां ने।।

आमच्या हिंदुस्थानात सर्वसाधारणपणे स्त्रीया डोळ्यात काजळ घालतात. जर काजळ दाठ असले तर ते डोळे चुरचुरू लागतात. जे डोळे दाठ काजळ सहन करू शकत नाहीत, आज त्या डोळ्यांमध्ये किड्यांनी आपली घरटी बनवून पिल्ले घातलेली आहेत. खेदास्पद गोष्ट आहे की, जर तू ध्यान-अभ्यास केला असतास, याजन्मात परमात्म्यास अंतर्यात भेटला असतास तर तुझा अस्थिपंजर असा निष्फळ झाला नसता.

फरीदा कूकेंदया चांगेंदया मत्तीं देंदयां नित।।
जो सैतान वंझाया से कित फेरह् चित।।

फरीद साहेब सांगतात की परमात्मा सदैव आपल्या प्रिय संत–महात्मांना या संसारात पाठवितो, ते आपल्या सत्संगाच्या माध्यमातून आम्हांस समजावतात, कळकळीचा हितोपदेश करतात की प्रिय बांधवांनो, कशासाठी या संसारात वणवण भटकत आहात, स्वत:चा बचाव करा, अंतसमयी या संसारातून कोणीही तुमच्या सोबत जाणार नाही. जेव्हा पत्नी प्राण त्यागून निघून जाते तेव्हा पती तिचे तोंड पहात रहातो, तसेच जेव्हा पती संसारातून प्राण त्यागून निघून जातो तेव्हा पत्नी हताश होऊन पहात रहाते, टाहो फोडून रडते की तुमच्याशिवाय माझे या संसारात कोण आहे? परंतु ती त्याची काही मदत करू शकत नाही. त्याचप्रमाणे आई वडिल बसले असता त्यांच्या मुलांचा मृत्यु होतो. म्हणून महात्मा आपणांस उपदेश देतात की या संसारात आपले कोण आहे? गुरु तेग बहादूरजी म्हणतात:

जगत में झूठी देखी प्रीत।
अपने ती हित स्यों लागे क्या दारा क्या मीत।
मेरो मेरो सबहों कहत है हित स्यों बाँधयो चीत।
मन मूर्ख अजे ने समझयो सिख दा हारयो नीत।
नानक भौजल पार परे जे गाए प्रभु दे गीत।

जर आपण परमात्म्याचे नामस्मरण केले तरच हा भवसागर पार होऊ शकतो. महात्मा अत्यंत प्रेमाने वारंवार समजावतात, कळकळीचा हितोपदेश देतात की कोणती गोष्ट तुमच्या फायद्याची आहे? गुरु रामदासजी सांगतात:

सन्तों सुनों सुनों जन भाई गुरु काढ़े बाँह कुकीजे।

ज्याप्रमाणे नाविक आपली नाव समुद्र किनारी उभी करून लोकांना हाक मारीत म्हणतो की ज्यांनी समुद्राच्या लाटांपासून स्वत:चा बचाव करून पलिकडील किनाऱ्यावर पोहचायचे आहे, त्यांनी माझ्या नावेत येऊन बसावे.

मी जाणकार व अनुभवी आहे, या नावेस पलिकडील किनाऱ्यावर पोहचविण्याची जबाबदारी माझी आहे, आपण तिथे सुखरूप पोहचाल. जसा नाविक हाक मारतो तसे गुरू सुद्धा या संसारात नामाची नाव घेऊन येतात व म्हणतात, ''प्रिय बांधवांनो, मला परमात्म्याकडून कृपाशीर्वाद मिळालेला आहे, जर आपण या नामाच्या नावेत बसलात तर आपणही या भवसागरापार होऊ शकता.''

जे आत्मा को सुख सुख नित लोड़ो तो सतगुरु शरण पवीजे।

जर आपण आपल्या आत्म्यास शांती देऊ इच्छित असाल, आपल्या आत्म्याचा परमात्म्याशी मेळ करू इच्छित असाल, तर आपण महात्मांकडे जाऊन त्यांची शरण प्राप्त करा.

फरीदा कूकेंदया चांगेंदया मत्तीं देंदयां नित।।
जो सैतान वंझाया से कित फेरह् चित।।

ज्या लोकांना काळाने बहकावून भ्रमात पाडलेले आहे त्यांस वाटते की हे जगच जीवनाचे सत्य आहे व या जगातील सांसारीक वस्तूच खऱ्या आहेत, मृत्यु तर इतरांसाठी आहे, आपल्यासाठी मृत्यु नाही, तेव्हा आपण सवडीने विचार करू, जर वेळ मिळाला तर महात्मांकडून नाम घेऊन येऊ. महात्मा थोडीच आपणांस नाम देण्यास नाकारणार आहेत! ते आपल्या योजनाच बनवित रहातात, मृत्यु येऊन त्यांचा गळा धरतो. गुरू नानक देवजी म्हणतात:

मनमुख जे समझाई ए भी औजड़ जाए।

ज्यांना दुष्ट सैतान मनाने वाममार्गावर लावलेले आहे, आपण त्यांस हवे तेवढे प्रेमाने समजावा, परंतु ते परमार्थाच्या दिशेला येऊच शकत नाहीत. आपण सांगता:

मनमुख ते गुरुमुख दा हो नहीं सकदा मेल।
वक्खों वक्ख दोहां दा रस्ता ज्यों पानी ते तेल।
ईक डोबे दूजा तारे ऐह है अजब प्रभु दा खेल।
ईक बाप दे दो बेटे एक पास तो दुजा फेल।।

मनमुख व गुरुमुख दोन्ही परमात्म्याचीच मुले आहेत. ज्याप्रमाणे एका शाळेत एकाच वडिलांची दोन मुले जातात. एकास चांगली तालीम मिळते व तो मोठा ऑफिसर बनतो तर दुसरा जनावरांप्रमाणे भटकत रहातो. परमेश्वराचा हा अजब खेळ आहे. ज्याप्रमाणे पाणी आणि तेल यांचे मिश्रण होत नाही, त्याचप्रमाणे नामाचे रसिक आणि सांसारीक मनुष्यांचा मेळ होऊ शकत नाही. महात्मा दुनियेतील कर्मकांडं करण्यास साल व नामाच्या कमाईस गर प्राप्त करणे असे संबोधतात. परमात्मा प्रिय महात्मा सदैव आपले लक्ष सालीपासून काढून गराकडे लावू इच्छितात. स्वामीजी महाराज देखील म्हणतात:

पानी मथे हाथ कुछ नाहीं, खीर मथन आलस भारा।

आपण पाण्यात हवी तेवढी रवी घुसळली तरीही त्यातून लोणी येऊ शकत नाही. जेव्हा दुधाने बनलेल्या दह्यात रवी घुसळली तेव्हास लोणी येते. आपण दही घुसळण्यास आळस करतो, कारण आपण सुरत–शब्दाचा ध्यान–अभ्यास करण्यात आळशी आहोत. म्हणून गुरू नानक देवजी सांगतात:

बुरे काम को उठ खलोया नाम की बेला पै पै सोया।

सैतानाने ज्यांना बहकावून वाममार्गी लावलेले असते, त्यांना महात्मांनी कितीही समजावले, चांगल्यातले चांगले वेद–शास्त्र जरी ऐकविले तरी त्यांना ते पटणार नाही.

फरीदा थीओ पवाही दभ।। जे साईं लोडह् सभ।।
इक छिजेंह् बिआ लताड़ीऐ।। तां सांईं दै दर वाड़ीऐं।।

कोणा एका माणसाने फरीद साहेबांकडे जाऊन विनंती केली की,''महात्माजी मला परमात्मा प्राप्तीचे साधन व पद्धत समजवा. काय मला परमेश्वर दरबारी जाणाची संधी मिळू शकेल का?'' फरीद साहेब एक छान उदाहरण देऊन समजावतात,''हे बघ प्रिय मित्रा, जर तू परमात्म्यास प्राप्त करू इच्छित असशील, तर तू आपल्या मनास गवताप्रमाणे बनव. गवतास कोणी पायाने तुडवतो तर कोणी दाताने चावतो तर कोणी त्यास पिळून त्याची चटई

बनवितो, परंतु गवत कोणास वाईट म्हणत नाही, सर्वांशी स्नेह–प्रेम करते. त्याच चटया सत्संगासाठी अंथरल्या जातात व प्रेमी त्यावर बसून ध्यान अभ्यास करतात. अशाप्रकारे तुला मुक्ती मिळू शकते. असे केल्याने तुला सांईंच्या दरबारात जाण्याची संधी मिळेल.

ध्यान–अभ्यास करणाऱ्यास महात्मांनी नेमलेल्या काही अटी पूर्ण कराव्याच लागतात. लोकलज्जा सोडावी लागते. लोकांचे टोमणे व निंदा–नालस्ती सहन करावी लागते. पदवी मिळण्याचा विचार देखील त्यागावा लागतो आणि मन, जो आपला जबरदस्त वैरी आहे, त्याच्याशी चार हात करून झुंज द्यावी लागते.'' तुलसी साहेब सांगतात:

तुलसी रण में जूझना घड़ी एक का काम। नित उठ मन से जूझना बिन खंडे संग्राम।।

रणांगणात मरणे अथवा मारणे केवळ एका क्षणाचे काम असते, परंतु मनाशी तर रोजच अस्त्राखेरीज संग्राम करावा लागतो. सतगुरूंनी आपणांस शब्द–धुनचे अस्त्र देऊन सुसज्ज केलेले आहे. गुरु नानक देवजी सांगतात:

मैं ते पंज जवान, गुरु थापी दित्ती कंड जिओ।

आमच्या मनाची व आत्म्याची बैठक तीसऱ्या तिळावर, आपल्या नेत्रांच्या मागील बाजूस आहे. पाचही डाकू काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार यांची बैठक देखील तेथेच त्रिकुटीमध्ये आहे. यात काही शंका नाही की आत्मा एकटा असतो, परंतु तू अंतर्यात जाऊन पहा, तुझे गुरू तुझ्या सोबत आहेत. तुला ज्या गोष्टीची गरज असेल, त्याची पूर्ती गुरू अंतरातूनच करतील, ही त्यांची ड्युटी आहे. आपण अंतर्यात जाऊन पहा, आपले गुरू आपल्या आधीच उपस्थित असतील. त्यासाठीच महात्मा आपणांस प्रेमाने समजावतात की जर आपण परमात्म्याच्या दरबारात जाऊ इच्छित असाल तर स्वत:च्या अंतरात नम्रता, प्रेम व दीनता उत्पन्न करा.

फरीदा खाक न निंदीए खाकू जेड न कोय।।
जीवंदयां पैरां तलै मोयां उपर होय।।

मी नेहमी सांगतो की केवळ तोच मनुष्य सदैव इतरांची निंदा करतो ज्यास एखादी लालुच असते. आपल्या लालसेची पूर्ती करण्यासाठी तो निंदा करतो. नामाची कमाई केलेले महात्मा अशा व्यक्तींवर देखील दया करतात व परमात्म्या पुढे विनंती करतात की तू यांना माफ कर, कदाचित यांनी आपले जीवन बरबाद करू नये. महात्मा नेहमी आपल्या सेवकांचा देखील या रोगांपासून बचाव करतात. महाराज सावन सिंहजी सांगत असत,''प्रत्येक इंद्रियात कोणता–ना–कोणता स्वाद असतो, परंतु निंदा ना आंबट आहे, ना गोड आहे, त्यात कोणताही स्वाद नसतो, तरीही निंदेने प्रत्येकास हैराण केलेले आहे.''

कोणी फरीद साहेबांची निंदा केली की फरीद साहेबांकडे काय आहे, आपण त्यांच्याकडे का जाता? कबीर साहेब निंदा करणाऱ्यांना निंदेत प्रत्युत्तर न देता, उलट असे म्हणत की,''प्रिय मित्रा, निंदा तर राखेची देखील करु नये. राख देखील खूप शक्तीशाली असते. मनुष्य जिवंत असताना तर राख त्याच्या पायाखाली येते, परंतु त्याच्या मृत्युनंतर कबरीत ती वर असते, म्हणून राखेचे देखील भय बाळगले पाहिजे.''

जर कोणी दुष्कृत्य केले तर त्यास शिक्षा देण्यासाठी परमात्मा बसलेला आहे. तो अभूल आहे, त्याच्या हातून चूक होत नाही. परमात्मा चांगली कर्मं करणाऱ्यांना देखील पहात आहे व वाईट कर्मं करणाऱ्यांना देखील पहात आहे. त्यास माहित आहे की कोणास ईनाम द्यावे व कोणास शिक्षा द्यावी.

फरीदा जा लब तां नेंह क्या लब त कूड़ा नेंह।।
किचर झत लंघाईए छप्पर तुटै मेंह।।

एक मनुष्य फरीद साहेबांची नक्कल करीत होता. त्याने कधी ध्यान–अभ्यास केलेला नव्हता, त्याची अंतर्यात प्रगती नव्हती. सर्वांपुढे दिखावा करण्यासाठी तो डोळे बंद करून बसत असे व परमार्थाच्या गोष्टी करीत असे, परंतु तो मायेचा पुजारी होता. तो सदैव श्रीमंत लोकांच्या शोधात असे की श्रीमंत लोक माझे अनुयायी बनावेत व मला भरपूर दान–दक्षिणा मिळावी. जो

त्यास भेटावयास येत असे त्यास तो सांगत फिरत असे की लंगर चालत नाही आणि संगतला रहाण्यासाठी इमारत देखील नाही. फरीद साहेब त्या माणसाच्या अंतरातील स्थिती पाहून म्हणू लागले,''प्रिय मनुष्या, तू लोकांपुढे दिखावा करण्यासाठी डोळे बंद करून बगळ्यासारखा समाधी धारण करून बसतोस, परंतु तुझे लक्ष तर मायेवर एकटक लागलेले आहे. एका म्यानात दोन तलवारी कशा राहू शकतील? तुझ्या मनात तर लालुच भरलेली आहे, तुझे परमात्म्याशी प्रेम कसे बरे होऊ शकेल? एकच गोष्ट होऊ शकते, एकतर परमात्म्याशी प्रेम होऊ शकते किंवा आपल्या लोभाची हव्यास पूरी होऊ शकते.''

आपण सांगता,''जीर्णशीर्ण झोपडी असेल व पाऊस पडत असेल, तर अशा झोपडीत किती वेळ बसून राहू शकाल? आपणांस विषय-विकारांचा रोग लागलेला आहे, कारण आयते व हरामाचे अन्न खाल्ले तर आपल्यात हरामच उत्पन्न होईल. मनुष्याचा अस्थिपंजर दिसून येतो परंतु त्यास आतून काम आणि क्रोधाने पोखरून पोकळ केलेले आहे.'' गुरु नानक देवजी सांगतात:

काम क्रोध काया को गाले, ज्यों कंचन सोहागा ढ़ाले।

तुझी काया खराब झालेली आहे, तू वयोवृद्ध झालेला आहेस, परंतु अजुनही तुझे लक्ष भोगवासनेपासून दूर हटत नाही. तू किती किती वेळ या शरीरात बसून परमात्म्याशी प्रेम करण्याचा दावा करीत रहाशील?

फरीद साहेब आपणांस घरोघरी दिसून येणारी उदाहरणे देऊन अत्यंत प्रेमाने समजावतात की आपण खऱ्याअर्थाने अंत:करणापासून गुरूंशी प्रेम केले पाहिजे. संत-सतगुरूंनी जो मार्ग दर्शविलेला आहे, आपण प्रामाणिकपणे व मनोभावे नामाची कमाई केली पाहिजे की ज्यामुळे ज्या परमात्मारुप गुरूंनी आपणांस नामाच्या जहाजात बसविलेले आहे, त्यांना आपणांस सच्चखंडास घेऊन जाणे सोपे व्हावे. कबीर साहेब म्हणतात:

दीन दयाल भरोसे तेरे सब परिवार चढ़ायो बेड़े।
जे तिस भावे हुक्म मनावे इस बेड़े को पार लंघावे।।



महात्मा आपल्या गुरुदेवांच्या भरोशावर या नावेस संसारातून ढकलतात की हे परमेश्वरा, तुच या आत्म्यांना पाठविणारा आहेस, तुच यांची व्यवस्था करू शकतोस, तुच यांना आपल्या चरणी जागा देऊ शकतोस. तुझी मर्जी आहे की यांच्याकडून ध्यान–अभ्यास करवून घ्यावा की नाही! आम्ही तुझ्या दयेने तुझ्या आसऱ्यावर बसलो आहोत. जेव्हा मनुष्य दुनियेतील सर्व आसरे सोडून केवळ गुरूंच्या सहाऱ्यावर रहातो, तेव्हा गुरूंना देखील आपला सांभाळ करण्याची काळजी लागते. जर आपण एखाद्या लहान बालकाप्रमाणे आपले विचार बनविले, तर गुरू आपली प्रत्येक गोष्ट पूर्ण करतात.

जे गुरु झिड़के तां मीठा लागे, बख्शे तां गुरु वडयाई।
लोग सलाहे तो तेरी उपमा, निन्दया छोड़ न जाई।।

हे सांगणे सोपे आहे की, जर गुरूंनी दटावले तर गोड वाटते. गुरूंचे दटावणे त्यांसच चांगले वाटते, जे स्वत:मध्ये दोष पहातात. ते म्हणतात की, आमच्यात दोष आहेत तेव्हाच सतगुरू आम्हांस दटावतात व जर गुरूंनी

आम्हास माफ केले तर यात देखील त्यांचीच उदारता आहे. जर लोकांनी आमची स्तुती केली की हा चांगला आहे, तर यात देखील त्यांचाच मोठेपणा आहे. आम्ही तर या स्तुतीपात्र नव्हतोच, चांगले बनलो तर हा तुमचाच महिमा आहे. जर लोकांनी निंदा–नालस्ती केली असती तर काय आम्ही तुमचे द्वार, तुमचा महिमा गाणे सोडले असते का? आम्हांस तर तुमच्या वैराग्याचे, प्रेमाचे व महिमेचे पोवाडे गाण्याचा रोग लागलेला आहे, आता तो सुटू शकत नाही.

अमली जीवे अमल खाए त्यों जन जीवे नाम ध्याए।

ज्याप्रमाणे व्यसनी मनुष्य नशा करणे हेच आपले जीवन आहे असे समजतो, त्यास माहित असते की मी जर मादक पदार्थांचे सेवन केले नाही तर मी मरून जाईन, माझ्या शरीरात वेदना होऊ लागतील, त्याचप्रमाणे परमात्म्याचे प्रेमी परमात्म्याचा, आपल्या गुरूंचा महिमा गातात. त्यांच्या जीवनात देखील त्यागोष्टीची लय लागते. त्यांस जेव्हा परमात्म्याचा विसर पडतो तेव्हा त्यांस आपला मृत्यु झाल्याप्रमाणे वाटते की हे श्वास व्यर्थच जात आहेत. जो श्वास परमात्म्याच्या स्मरणाखेरीज गेला तो काफर (नास्तिक) झाला. गुरू नानक देवजी म्हणतात:

ईक छिन विसरे स्वामी जानो बरस पचासा।

एका सेकंदाकरीता जरी परमात्म्याचा विसर पडला तर परमात्म्याशी पन्नास वर्षांइतका विरह झाल्याप्रमाणे वाटते. आपणही फरीद साहेबांप्रमाणे आपल्या अंत:करणात उठता–बसता, झोपेत–जागृत अवस्थेत आपल्या गुरूदेवांचे स्मरण करावे, अंतर्यात जाऊन त्यांच्या खऱ्या महिमेस पहावे की ते आपल्यासाठी दरवाजा उघडतात व आपल्याला छातीशी धरतात. ते प्रेम देण्यासाठीच येतात. आपणांस या जीवनापासून फायदा घेतला पाहिजे.

***

प्रश्नोत्तरे

परमसंत अजायब सिंह महाराजांनी प्रेमींच्या प्रश्नांची दिलेली उत्तरे,
सांपला, हरियाणा – १० डिसेंबर १९९६

एक प्रेमी – ज्याप्रमाणे महाराज कृपाल सिंहजी अंतर्यातील दर्शन व आवाज ऐकण्याविषयी सांगत असत, काय आपणसुद्धा त्याचप्रमाणे आम्हांस अंतर्यातील दर्शन व धुनात्मक आवाजाबद्दल काही सांगाल का?

बाबाजी – परमपिता परमात्मा सावन कृपालजींच्या चरणी नमस्कार आहे, ज्यांनी आम्हांस आपल्या आठवणीत बसण्याची आणि आपले गुणगान करण्याची संधी दिली. मी या विषयावर स्वामीजी महाराज आणि गुरू नानक देवजी यांच्या वाणीवर सत्संगात खूप काही सांगितलेले आहे. आपण नियमित संतवाणी मासिक जरूर वाचा, म्हणजे आपणांस खात्री पटेल.

जे संतमताविषयी गोष्टी करतात, त्यांचे लक्ष्य अंतर्यासाठीच असते, बाहेर तर फक्त उदाहरणासाठी बोलले जाते. काल गुरु नानक देवजींच्या वाणीवर सत्संग होता, ज्यात त्यांनी समजावले, ज्याप्रमाणे नदी आपल्या प्रवाह क्षेत्रापासून दुरावून समुद्रात जाऊन मिळते त्याचप्रमाणे परमात्म्यापासून विरह पावलेला आत्मा शब्दावर स्वार होऊनच परमात्म्याशी मिळू शकतो.

आपल्याला माहीत आहे की, पाणी सूर्याच्या उष्णतेने वाफ बनून उडते. हे पाणी कितीतरी उंचसखल जागेवरून, दगडगोटे व खड्यांमधून आधळत –आपटत, पडत–पडत खूप दूरवरचा प्रवास करून मग कोठे जाऊन आपल्या मूळस्थानी समुद्रात जाऊन मिळते. कित्येकदा पाण्याला दीर्घकाळ घाणीत राहावे लागते. मग कधी पाऊस पडतो तेव्हा तेच पाणी नदी–नाळ्यांमधून वाहात–वाहात समुद्रात जाऊन पडते. मग कोणी ओळखू शकत नाही की हे नदीचे पाणी आहे की समुद्राचे पाणी आहे. ते एकरूप होते. गुरु अर्जुनदेवजी महाराज उदाहरण देऊन समजवतात.

ज्यों जल में जल आए खटाना, त्यों ज्योति संग मिल ज्योत समाना।

जर आपण एका दिव्याच्या जवळ दुसरा मोठा दिवा लावला, तर त्यांच्या प्रकाशाला कोणी ओळखू शकत नाही की लहान ज्योतीचा प्रकाश कोणता व मोठ्या ज्योतीचा प्रकाश कोणता. तसेच हे सांगता येणे कठीण आहे की आपला आत्मा त्या समुद्ररूपी परमात्म्याशी विरह होऊन किती वेळा वनस्पती, मच्छर, कीडे, साप व कावळ्याच्या योनीत गेला? किती वेळा हा आत्मा पती किंवा पत्नी बनला? कधी ह्या आत्म्याने पूर्वेला जन्म घेतला तर कधी पश्चिमेला जन्म घेतला. कधी ह्याने सुखाचे श्वास घेतले तर कधी दुखात व आजारपणात आयुष्यभर तळमळत राहिला.

आत्मा न जन्म घेतो न मरतो. परंतु ज्या शरीराच्या आत याचा निवास आहे ते शरीर रोगी आहे. जेव्हा आपण रोगी जागेत राहू तेव्हा आपल्यावर त्याचा परिणाम जरूर होतो. ज्याप्रमाणे अग्नित लोखंड घातले तर लोखंड जळत जरी नसले तरी पण अग्निचा दाह तर त्याला सहन करावाच लागतो.

प्रियजनहो, आत्म्याने ज्या शब्दावर स्वार होऊन जायचे आहे, ज्याच्या सोबतीने त्यास आपल्या मूळस्थानी म्हणजे सचखंडात जायचे आहे, तो शब्द वाजंत्रींसोबत गायला जाणारा वा लिहिता–वाचता येणारा किंवा बोलला जाणारा शब्द नाही. तो कुठल्याही भाषेतील शब्दही नाही, तो लिहिण्या–वाचण्याच्या पलिकडील शब्द आहे. त्या शब्दाला समुद्र म्हणा किंवा समुद्रातून निर्माण होणारा आवाज म्हणा, तो आपल्या कपळामागे निनादत आहे.

मी पूर्वीदेखील कित्येकदा सांगितले आहे की जेव्हा नदीचे पाणी आपल्या मुख्यप्रवाह क्षेत्रातून निघते तेव्हा त्याचा निराळा आवाज असतो, जेव्हा तेच पाणी दगडातून जाऊ लागते तेव्हा त्याचा अजून निराळा आवाज येतो, जेव्हा तेच पाणी स्वच्छ जमिनीवर येते तेव्हा त्याचा निराळा आवाज येतो. परंतु जेव्हा तेच पाणी समुद्रात जाऊन पडते, जेव्हा नदीच्या पाण्याचा समुद्राच्या पाण्याशी संगम होतो, तेव्हा त्याचा वेगळाच आवाज होतो.

पाण्याचा उगम एकाच मूळस्थानातून होतो, परंतु त्या पाण्याला जसे-जसे वातावरण मिळते, जशी जशी धरती मिळते, त्याप्रमाणे त्याचा आवाज बदलतो. त्याचप्रमाणे सच्चखंडातून एकच शब्द उत्पन्न होतो, परंतु प्रत्येक मंडळात त्याचा आवाज बदलतो. जन्म-जन्मांतरापासून आपले लक्ष (ध्यान) बाहेर भटकत आहे. परमात्म्याने आपल्या नेत्रांमागे पडदा लावून आपल्याला बाहेर काढले आहे, त्यामुळे आपण बाहेरील आवाज ऐकत आहेत. संत आपणांस सांगतात की, आपल्या अंतर्यात अनेक प्रकारचे आवाज येतात. आपण त्यातूनच एखादा आवाज निवडा. त्या आवाजाला रोज-रोज बदलू नका मग जरी तो आवाज साँय-साँय असा असला तरी, तो लहानसा आवाजच आपल्या आत्म्याला वर घेऊन जाईल. वर जाऊन काही शंका - कुशंका बाकी राहात नाही, कारण आवाज तर एकच आहे.

प्रियजनो, आपल्या अंतर्यात हा आवाज इतका जोरात प्रतिध्वनित होत असतो की सुरुवातीला आपण या आवाजाला सहन करू शकत नाही.



अनेक प्रेमी तक्रार करतात की शब्दाचा प्रतिध्वनी अत्यंत प्रखर आहे. आपल्याला शब्द ह्यासाठी खेचत नाही कारण आपले लक्ष बाह्यजगात विखुरलेले आहे. आपण रोज–रोज आवाज ऐकत नाही.

सत्संगी आवाजाच्या महानतेला समजत नाही. जर सत्संगी आवाजाच्या आकर्षणकक्षेत आला तरच तो शब्द त्याला आकर्षित करेल. जर लोखंड चुंबकाच्या आकर्षणकक्षेत असेल तेव्हाच चुंबक लोखंडाला आकर्षित करेल. पण जर लोखंड दूर असेल किंवा लोखंडाला गंज लागलेला असेल तर चुंबक त्याला आकर्षित करू करू शकणार नाही. आपल्यावर वाईट कर्मांचा व पापांचा गंज चढलेला आहे. आपणांस नामस्मरणाच्या महानतेची कल्पना नाही. नामस्मरण आपल्या पापांचा मळ काढते. नामस्मरणाद्वारेच आत्म्याचा आरसा चकाकतो. ज्यापमाणे झाडूने आपण घर साफ करतो, त्याचप्रमाणे नामस्मरण आपल्या अंतर्यातील घाण धुवून बाहेर काढून टाकते. जेव्हा आत्मा साफ असेल तेव्हाच आपल्याला त्यात आपले तोंड दिसेल व त्यास शब्द पण सहज आकर्षित करेल.

संत म्हणतात, नामस्मरणामार्फत नऊ द्वार रिकामी करा (नऊ द्वारांतून लक्ष काढा). जेव्हा आपण शब्दरूपी नामाशी जुडतो तेव्हा तो शब्द आपल्याला वर खेचतो, नामस्मरणाचा अर्थ येथे पोहोचणे आहे. नामस्मरणात शांती व सुख आहे. नामस्मरण केल्याने मनाला शितलता लाभते, परंतु आपण सत्संग्यांना नामस्मरणाच्या महानतेचे ज्ञान नाही. ज्यांना नामस्मरणाच्या ताकदीचे महत्त्व कळते ते एक सेकंद देखील नामस्मरण सोडाण्यास तयार नसतात. गुरु अर्जुनदेवजी महाराज म्हणतात:

सिमरो सिमर सिमर सुख पावो, कल क्लेश तन माहे मिटावो।

आपल्या अंतरात जे वाईट विचार येतात आणि वाईट स्वप्न आपल्याला त्रास देतात हे सर्व नामस्मरण केल्याने नाहीसे होतील. नामस्मरण केल्याने आपल्याला शांती मिळेल आणि स्वप्न जरी आले तरी गुरुंचेच येईल.

खूपशा संतांनी नामस्मरणाला जप म्हणून पण संबोधले आहे. सुरुवातीस आपण जीभेने नामस्मरण करतो, मग हळू–हळू मनाद्वारे नामस्मरण होऊ लागते, तेव्हा त्यातील रस वाढतो. याचप्रमाणे मनाने नामस्मरण करता करता आपण आत्माद्वारे नामस्मरण करू लागतो. जर परमेश्वराचे नामस्मरण जीभेवर आले तर आपल्याला तासंतास समजणारच नाही की आपल्याला नामस्मरण करीत एवढा वेळ झाला आहे,जसे पायी चालता चालता कित्येक मैल अंतर पार केले तरी लक्षात येत नाही. कबीर साहेब म्हणतात:

जाप मरे अजपा मरे अनहद भी मर जाए।
सुरत समानी शब्द में ताको काल न खाए।।

मग हा जीभेने करायचा जप बंद होतो व आत्मा शब्दावर स्वार होतो व शब्दाशी एकरंग होतो. जेव्हा आपण याच्याही वर जातो, तेव्हा आपला आत्मा आणि शब्दाच्या मध्ये काही अंतर राहात नाही. जेव्हा आत्मा त्या जागेवर पोहाचतो तेव्हा दोन्ही हात वर करून सांगू शकतो की माझा आत्मा काळाच्या जाळ्यातून स्वतंत्र झालेला आहे. काळदेखील आपले ध्यान तेथून काढतो की आता हा आत्मा माझ्या जाळ्यातून निघून गेला आहे.

जेव्हा सेवकाचा आत्मा शब्दाशी जोडला जातो, शब्दरूप होऊन जातो, तेव्हा गुरुंची जबाबदारी संपते. गुरु प्रसन्न होतात की एकतरी आत्मा काळाच्या जाळ्यातून निघाला आहे.

प्रिय मुलांनो, नामस्मरण करायला काही खर्च येत नाही. ज्याप्रमाणे मुले खेळत असतादेखील एक, दोन, तीन, चार असे आकडे मोजत असतात, त्याचप्रमाणे आपण गप्पा मारताना देखील नामस्मरण करू शकता. नामस्मरण करताना आपल्याला काही ओझे उचलायचे नसते. आपण विमानात प्रवास करतानासुद्धा नामस्मरण करू शकतो.

***

प्रेरणा

परम संत अजायब सिंहजी महाराजांनी सत्संगाच्या कार्यक्रमाच्या अखेरीस दिलेला एक संदेश, संतबानी आश्रम, १६ पी एस, राजस्थान

मी त्या सर्व कर्त्या-करवित्या परमात्मा शब्दरूप दयाळू कृपालजींचा धन्यवाद करतो. आपण आम्हा दु:खी आणि तळमळत्या आत्म्यांची तहान भागवण्या करीता ह्या संसारात देह धारण करून आलात. आपण आम्हांस भक्ती करण्याची आणि आपल्या मधुर आठवणीत बसण्याची संधी दिली. इथे ध्यान-अभ्यास आणि नामस्मरणाचा कार्यक्रम आपल्या दयेने व आपल्या परवानगीने ठेवला गेला होता, तो आता समाप्त झालेला आहे. आपणांस एक आठवडा **प्रेरणा** दिली गेली आहे की या संसार मंडळावर आपले कोणते दोष आहेत व ते दोष त्यागणे किती जरूरी आहे. आत्म्याचा आरसा स्वच्छ करण्यासाठी ध्यान-अभ्यास व नामस्मरण करणे किती गरजेचे आहे.

मी आपल्या सर्वांच्या परतीच्या प्रवासासाठी शुभकामना करतो. मी आशा करतो की आपण सर्वांनी आपापल्या घरी जाऊन आपल्या कुटुंबातील सदस्यांनादेखील माझे प्रेम द्यावे, त्यांनीसुद्धा आपल्या गोष्टी ऐकून लाभ घ्यावा व त्यांच्या अंत:करणातही गुरुंवर श्रद्धा निर्माण व्हावी.

प्रियजनहो, आपण महाराजजींच्या सांगण्यानुसार नियमित डायरी लिहीत जा आणि ध्यान-अभ्यास व नामस्मरण करा. आपणांस संसारात ज्या जबाबदाऱ्या मिळालेल्या आहेत त्यांसदेखील पुऱ्या करा.

***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीत
संतबानी आश्रम, राजस्थान येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमांची माहिती

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या अपार दयेने ***संतबानी आश्रम, १६ पी. एस. राजस्थान*** *येथे त्यांच्या मधुर आठवणीत खालील तारखांवर सत्संगाचा कार्यक्रम आयोजित केला जात आहे.*

२६ डिसेंबर	***ते***	***२८ डिसेंबर २०१४***
२ फेब्रुवारी	***ते***	***६ फेब्रुवारी २०१५***
२७ फेब्रुवारी	***ते***	***१ मार्च २०१५***
३१ मार्च	***ते***	***२ एप्रिल २०१५***

सर्व बंधू-भगिनींनी महाराजजींच्या कार्यक्रमात सहभागी होऊन नामस्मरणाचा व संतवचनांचा लाभ घ्यावा ही नम्र विनंती.

***